आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२८ मार्च २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- यवतमाळ-वाशिम, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, हिंगोली, नांदेड, आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघांत अर्ज दाखल करायला सुरुवात
- रामटेक लोकसभा मतदारसंघातल्या काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र समितीकडून अवैध
- संविधान बदलण्याची भाषा केली तर मंत्रीपदाचा राजीनामा देण्याचा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांचा इशारा
- पीएचडीसाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा न घेता नेट परीक्षेचे गुण ग्राह्य धरण्याच्या युजीसीच्या सूचना
- देशातल्या शेअर बाजाराचे निर्देशांक उच्चांकी पातळीच्या जवळ

  **आणि**
- राज्याच्या बहुतांश भागात येत्या २ दिवसात पावसाची शक्यता, विदर्भात उष्णतेची लाट येण्याचाही अंदाज

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात देशभरातल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे येत्या  २६ एप्रिलला मतदान होणार आहे. महाराष्ट्रात ८ जागांवर मतदान होणार आहे. त्यात यवतमाळ- वाशिम, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, हिंगोली, नांदेड, आणि परभणी या मतदारसंघांचा समावेश आहे. या टप्प्यातल्या निवडणूकासाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली असून अर्ज भरण्याची शेवटची तारीख ४ एप्रिल आहे. ८ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**<><><><><>**

बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज सादर केला असून त्यासोबत त्यांनी अपक्ष म्हणूनही अर्ज भरला आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघातले शिवसेनेचे विद्यमान खासदार प्रतापराव जाधव हे शिंदे गटात आहेत. मात्र शिवसेनेनं अद्याप या मतदारसंघासाठी उमेदवार घोषित केलेला नाही. संजय गायकवाड यांनी आपण अर्ज मागं घेणार नसल्याचं सांगितलं आहे.

नांदेड लोकसभा मतदारसंघात आज अपक्ष उमेदवार  जफर अली खाँ मेहमूद अली खाँ पठाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

परभणी लोकसभा मतदार संघात आज पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही, मात्र आज  २१ जणांना २६ नामनिर्देशन पत्रांचं वितरण करण्यात आलं.

**<><><><><>**

रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीनं अवैध ठरवलं आहे.
जातवैधता प्रमाणपत्र मिळवताना कायदेशीर प्रक्रिया पार पडण्यात आलेली नाही, असा दावा करण्यात आला होता. तक्रारीनंतर सामाजिक न्याय विभागानं जात पडताळणी समितीला योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले होते. सामाजिक न्याय विभागाच्या आदेशानंतर जात पडताळणी समितीनं बर्वे यांना नोटीस जारी केली होती. याच नोटिशीला बर्वे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यानंतर बर्वे यांचं जात वैधता प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय पडताळणी समितीनं दिला आहे.

रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्याची कारवाई ही राजकीय सुडबुद्धीतून केलेली आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

**<><><><><>**

भाजपाचे काही नेते संविधान बदलण्याचं वक्तव्य करत असल्याचं सांगत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जर कुणी संविधान बदलण्याची भाषा केली तर मंत्रीपदाचा राजीनामा देईन, असा इशाराही त्यांनी दिला आहे. ते आज पुण्यात वार्ताहर परिषदेत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आंबेडकरी चळवळीला सातत्यानं सन्मानाचं स्थान दिलेलं आहे, पण काही नेते बेताल वक्तव्य करून समाजामध्ये चुकीच्या गोष्टी पसरवत आहेत, असं ते म्हणाले.

आठवले यांनी आज पुण्यात रिपाईच्या राज्य कार्यकारणीच्या बैठकीला मार्गदर्शन केलं. कार्यकर्ते महायुतीवर नाराज आहेत, शिर्डी लोकसभेची जागा अजून निश्चित झालेली नाही, आमच्या जनतेच्या मागण्या महायुतीनं मान्य केल्या पाहिजेत, आमची मतं पाहिजे असतील तर आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये रिपाईला योग्य सन्मान मिळाला पाहिजे, असं ते यावेळी म्हणाले. प्रकाश आंबेडकर हे B टीम नाहीत, असंही आठवले म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसनं राज्यातल्या निवडणुकीसाठी आज ३७ जणांच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली.

या यादीत राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्यासह प्रफुल पटेल, सुनिल तटकरे, छगन भुजबळ,दिलीप वळसे पाटील, रामराजे नाईक निंबाळकर, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, धर्मरावबाबा आत्राम आदींचा समावेश आहे.

<><><><><>

हिंदी चित्रपट सृष्टीतले अभिनेता आणि माजी खासदार गोविंदा यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून मुंबईत पायाभूत सुविधा, सुशोभिकरण इत्यादी कामं चांगल्या प्रकारे झाल्याचं दिसत आहे. त्यामुळे आपण त्यांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला, असं त्यांनी सांगितलं. एकनाथ शिंदे यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं. २००४ त्या २००९ या काळात गोविंदा काँग्रेसचे खासदार होते.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारांनी आज दमदार तेजी नोंदवली. व्यवहारादरम्यान सेन्सेक्सनं ७४ हजार १९० अंकांना स्पर्श केला होता. सार्वकालिक उच्चांकांच्या तुलनेत ही पातळी केवळ ५५ अंकांनी कमी आहे.

निफ्टीनं व्यवहारादरम्यान २२ हजार ५१६ अंकांना स्पर्श केला. सार्वकालिक उच्चांकापेक्षा ही पातळी केवळ १० अंकांनी कमी होती. दिवसअखेर मात्र दोन्ही निर्देशांकांत या पातळीच्या तुलनेत थोडी घसरण झाली. सेन्सेक्स ६५५ अंकांनी वधारून ७३ हजार ६५१ अंकांवर तर निफ्टी २०३ अंकांची वाढ नोंदवून २२ हजार ३२७ अंकांवर स्थिरावला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये आज संध्याकाळी जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सचा सामना दिल्ली कॅपिटल्स बरोबर संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होत आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून सर्व विद्यापीठांनी पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केवळ नेट परीक्षेचे गुण, म्हणजेच राष्ट्रीय पात्रता चाचणीचे गुण ग्राह्य धरावेत, असे निर्देश युजीसी, अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगानं दिले आहेत. त्यानुसार पीएचडी अभ्यासक्रमासाठी विविध विद्यापीठं आणि उच्च शिक्षण संस्थांच्या प्रवेश परीक्षांऐवजी केवळ नेट परीक्षेचा निकाल ग्राह्य धरला जाईल.

<><><><><>

शिवसेनेनं ८ लोकसभा उमेदवारांची पहिली यादी आज संध्याकाळी जाहीर केली. त्यात ७ विद्यमान खासदारांना पुन्हा संधी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. दक्षिण मध्य मुंबईतून राहुल शेवाळे, कोल्हापुरातून संजय मंडलिक, शिर्डीतून सदाशिव लोखंडे, बुलडाण्यातून प्रतापराव जाधव, हिंगोलीतून हेमंत पाटील, मावळमधून श्रीरंग बारणे आणि हातकणंगलेतून धैर्यशील माने या विद्यमान खासदारांना एकनाथ शिंदे यांनी पुन्हा उमेदवारी दिली आहे. रामटेकमध्ये विद्यमान खासदार कृपाल तुमणे यांच्याजागी आधीच राजू पारवे यांची उमेदवारी जाहीर झाली असून त्यांनी अर्जही दाखल केला आहे.

<><><><><>

महाराष्ट्र छत्तीसगड सीमेवरच्या भूमकान गावाजवळच्या जंगलात काल संध्याकाळपासून आज पहाटेपर्यंत पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक झाली. यावेळी अंधाराचा फायदा घेत नक्षलवादी फरार झाले. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घातपात करण्याच्या उद्देशानं या भागातले नक्षलवादी गट जंगलात एकत्र आले होते.

<><><><><>

रायगड जिल्ह्यातील मुरुड किनारपट्टीवर बेकायदेशीर मासेमारी केल्याप्रकरणी तटरक्षक दलानं ३७ मच्छिमारांना ताब्यात घेतलं आहे. या कारवाईत पोलिसांनी ४ मच्छिमार नौका, उच्च शक्तीचे ४२ हॅलोजन, २२ पाण्याखालचे एलईडी डिझेल जनरेटर तसंच प्रतिबंधित मासेमारी गिअर असं एकूण ३० लाखांचं साहित्य जप्त केलं आहे. या एलईडी मासेमारीमुळं स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

फाल्गुन वद्य तृतीया ही छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार साजरी होणारी शिवजयंती आज विविध ठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरी होत आहे. शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या किल्ले शिवनेरीवर विविध सामाजिक संस्थांनी तसंच  गड किल्ले संवर्धक मंडळांनी शिवजयंती साजरी केली. यावेळी अनेक राजकीय नेतेही उपस्थित होते. मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळावरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तर शिवाजी पार्क इथं राज ठाकरे यांनी अभिवादन केलं.

<><><><><>

विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी किंचीत वाढ झाली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोल्यामध्ये  ४२ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. सातारा शहरासह जिल्ह्याच्या काही भागात आज दुपारी अवकाळी पावसानं हजेरी लावली.

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज आणि उद्या, तर विदर्भात पुढले दोन दिवस तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, या काळात कोकणात

उष्ण आणि दमट हवामान राहील, तर विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//